# जिल्हा परिषद रत्नागिरी
# जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष,
# जिल्हा परिषद रत्नागिरी.

# स्वारस्य अभिव्यक्ति (EOI)फॉर्म

कामाचे नांव :- स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत रत्नागिरी जिल्हयात सन २०२१-२२ व २०२२-२३ साठी घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प कामाकरिता सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/ सहाय्य प्रदान करण्यासाठी संस्थेची निवड करणे.

तांत्रिक/ व्यावसायीक/ स्वयंसेवी संस्थेचे नांव:- ______________________________

तांत्रिक/ व्यावसायीक/ स्वयंसेवी संस्थेचा पत्ता :- ______________________________

## प्रपत्र - अ

| अ.क्र. | तपशिल | |
|---|---|---|
| १) | तांत्रिक/ व्यावसायीक/ स्वयंसेवी संस्थेचे नांव | |
| २) | कार्यालयाचा पत्ता व संपर्क क्रमांक, ई-मेल आय.डी. | |
| ३) | संपर्क करावयाच्या व्यक्तीचे नांव व संपर्क क्रमांक | |
| ४) | तांत्रिक/ व्यावसायीक/ स्वयंसेवी संस्था नोंदणी प्रमाणपत्र. | सोबत जोडावे |
| ५) | GST प्रमाणपत्र | सोबत जोडावे |
| ६) | मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्र | सोबत जोडावे |
| ७) | मागील १-५ वर्षे सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन मध्ये तांत्रिक सहाय्य संस्था म्हणुन काम केल्याचे शासकीय/ निमशासकीय (शासनाचे) अनुभव प्रमाणपत्र. | सोबत जोडावे |
| ८) | किमान १ वर्षाचा सागरी किनारी भागात सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन मध्ये तांत्रिक सहाय्य संस्था म्हणुन काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र. | सोबत जोडावे |
| ९) | तांत्रिक/ व्यावसायीक/ स्वयंसेवी संस्था काळ्या यादीत नसल्याबाबत १००रु. बॉण्ड पेपरवर प्रतिज्ञापत्र. | सोबत जोडावे |
| १०) | अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र | सोबत जोडावे |

सही व शिक्का

## प्रपत्र - ब

| **तांत्रिक मनुष्यबळाचा तपशिल (किमान ५)** | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | नांव व पदनाम | शिक्षण | अनुभव | शिक्षण व अनुभव प्रमाणपत्र |
| १) | | | | सोबत जोडावे |
| २) | | | | सोबत जोडावे |
| ३) | | | | सोबत जोडावे |
| ४) | | | | सोबत जोडावे |
| ५) | | | | सोबत जोडावे |

**टिप :- किमान ५ व्यक्ती, त्यापैकी १ स्थापत्य अभियंता व १ पर्यावरण अभियंता असणे आवश्यक (बंधनकारक) आहे. गावांच्या संख्येनुसार मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावा लागेल.**

सही व शिक्का

## -: अटी व शर्ती :-

| | |
|---|---|
| १) | सदर निविदेचे दर कार्यारंभ आदेशापासून एक वर्षापर्यंत वैध राहतील. याबाबत मधील कालावधीत शासनाकडून दरात कपात झाल्यास त्यानुसार अथवा शासनाकडून प्राप्त झालेल्या निर्देशानुसार बदल झाल्यास ते पात्र निविदाधारकास बंधनकारक राहील. |
| २) | तांत्रिक/ व्यावसायीक/ स्वयंसेवी संस्था यांना सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाचा किमान एक ते पाच वर्षाचा शासकीय/ निमशासकीय अनुभव आवश्यक आहे. |
| ३) | जागेची उपलब्धता / परवाने यांची खात्री करुन प्रस्ताव करावेत. प्रस्ताव तांत्रिक व प्रशासकिय मंजूरी मिळेपर्यंत त्यामध्ये होणाऱ्या बदलानुसार प्रस्तावातील बदल आहे त्याच किंमतीत करावा लागेल. |
| ४) | सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR)ची तपासणी करुन दिलेल्या नमुन्या नुसार व बरोबर असल्याची खात्री करुन वरिष्ठ कार्यालयाच्या परवानगीने व निर्देशानुसार, एम्पॅनेलमेंट व्यावसायिक संस्था / स्वयंसेवी संस्था यांनी सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रकीय प्रस्ताव तयार करणे, आराखडा तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/ सहाय्य प्रदान करणे याबाबीकरिता, ग्रामस्तरीय घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाकरिता तसेच जिल्हास्तरीय प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेंट, मैला व्यवस्थापन (फिकल स्लज मॅनेजमेंट) व गोबरधन करिता प्रत्येकी अनुज्ञेय असलेल्या निधीच्या ५% किंवा रुपये १,००,०००/- (रुपये एक लक्ष फक्त) यापैकी जी कमी असेल त्या रकमेची तरतुद प्रकल्पाच्या अंदाजपत्रकामध्ये अंतर्भुत करावी. तथापि प्रदानची रक्कम संबंधित ग्रामपंचायत द्वारा अदा करण्यात येईल. सदर रक्कम अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट नसल्यास रक्कम अनुज्ञेय असणार नाही. व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्था यांना शुल्क म्हणून शासन स्तरावरुन संबंधीत गावाच्या घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी निधी उपलब्ध झालेनंतरच ग्रामपंचायतीमार्फत अदा करण्यात येईल. |
| ५) | घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प आराखडयामध्ये खालील बाबींचा समावेश आहे. |
| अ) | घनकचरा व्यवस्थापन |
| | १. सार्वजनिक कंपोस्ट पिट. |
| | २. ट्रॉय सायकल, बॅटरी ऑपरेटेड ट्रॉय सायकल. |
| | ३. गावासाठी प्लास्टिक कचरा साठवण करण्यासाठी शेडचे बांधकाम करणे. |
| | ४. कुटुंबस्तरीय कचरा कुंडया. |
| | ५. सार्वजनिकस्तरीय कचरा कुंडया. |
| | ६. कुटुंबस्तरीय कंपोस्ट पिट. |
| | ७. कचरा वर्गीकरण साठवण व कंपोस्ट प्रकल्प परिसराचे व्यवस्थापन. |
| | ८. कचरा गोळा व वर्गीकरण करणे, यासाठीचे अदा करावयाचे मानधन / वेतन. |
| | ९. कचरा वर्गीकरणासाठी आवश्यक अवजारे. |
| | १०. परिसर स्वच्छतेसाठी आवश्यक अवजारे. |
| | ११. घनकचरा व्यवस्थापनाची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती. |
| | १२. मासिकपाळी व्यवस्थापन |
| ब) | सांडपाणी व्यवस्थापन |
| | १. सार्वजनिक शोषखड्डा, मॅजिक पिट/ पाझर खड्डा. |
| | २. कुटुंबस्तरीय शोषखड्डा, मॅजिक पिट/ पाझर खड्डा. |
| | ३. स्थिरीकरण तळे, Dewats, नाल्या व बंदिस्त गटारे, etc. |
| | ४. सांडपाणी व्यवस्थापनाची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती. |
| क) | प्लास्टिक कचरा व्यवस्थापन |
| | १. प्लास्टिक कचरा मटेरीयल रिकव्हरी फॅसिलिटी (तालुकास्तर) |
| | २. प्लास्टीक कचरा Shreading Machine (तालुकास्तर) |
| | ३. प्लास्टिक कचरा बेलींग मशिन (तालुकास्तर) |
| | ४. डस्ट रिमुव्हर मशिन (तालुकास्तर) |
| | ५. ग्रामस्तरीय साठवण शेड |
| | ६. ग्रामस्तरीय साठवण शेड पासून तालुकास्तरीय प्लास्टिक व्यवस्थापन युनिटपर्यंत वहन. |
| | ७. प्लास्टिक कचरा व्यवस्थापन दैनंदिन देखभाल व दुरुस्ती. |

| | |
|---|---|
| ड) | मल व्यवस्थापन - ट्विन पिट रिट्रोफिटींग शक्य नसलेल्या लोकसंख्येसाठी (जिल्हास्तरीय) |
| | १. डिप रो एनस्ट्रेचमेंट |
| | २. अनप्लांटेड ड्रॉईंग बेड |
| | ३. प्लांटेड ड्रॉईंग बेड |
| | ४. फिकल स्लज मॅनेजमेंट प्लांट |
| | ५. को ट्रिटमेंट नजिकच्या अस्तित्वातील प्रक्रिया प्लांटद्वारा कृतीसंगमातून |
| | ६. मलव्यवस्थापन दैनंदिन देखभाल व दुरुस्ती |
| इ) | गोबरधन |
| | १. गोबरधन प्रकल्प (जिल्हास्तरीय) |
| | २. स्केलीग अप गोबरधन प्रकल्प किमान १० प्रकल्प प्रती तालुका |
| | ३. गोबरधन प्रकल्प दैनंदिन देखभाल व दुरुस्ती |
| ६) | घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाबाबत काम करित असताना केंद्र शासन व राज्य शासनाने वेळोवेळी पारीत केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार काम करणे बंधनकारक आहे. |
| ७) | कार्यारंभ आदेशा प्राप्त होताच तात्काळ सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन संबंधित उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग यांचेकडे सादर करणेचे आहेत. |
| ८) | सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार झाल्यानंतर सदर अहवालास प्रथम ग्रामसभेची मंजूरी घेवून तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय बाबींची तपासणी करण्याकरीता उपअभियंता ग्रापापु, ग.वि.अ. पंचायत समिती व तालुका संपर्क तज्ञ/ सल्लागार यांच्याकडे तपासणीकरीता व मान्यतेकरीता सादर करावे. तद्नंतर कार्यकारी अभियंता (ग्रापापु), उप मु.का.अ. (पा.वस्व.) यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करावेत. |
| ९) | सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेस विलंब झाल्यास आपण दंडास पात्र रहाल. (दंड किती आकारावयाचा याबाबत मा.मु.का.अ., जि.प. यांचे आदेश अंतिम राहतील) |
| १०) | सदरचे दर सन २०२१-२२ च्या आर्थिक वर्षासाठी लागू राहतील. आर्थिक वर्ष संपल्यावर आवश्यक असल्यास मुदतवाढ देणे किंवा नवीन दरपत्रक मागविणे ही बाब उप मु.का.अ.(पा.व स्व.) यांच्या अधिकारात राहील. |
| ११) | वेळोवेळी मा.मु.का.अ., उप मु.का.अ.(पा.व स्व.) व कार्यकारी अभियंता (ग्रापापु) तसेच वरिष्ठ कार्यालयाने दिलेल्या लेखी व तोंडी सुचनेनुसार कार्यवाही करणेत यावी. |
| १२) | निवडलेल्या संस्थेस ग्रामपंचायतीकडून देय असणारा निधी वितरीत करण्याचे टप्पे -<br>• सर्वेक्षण व PFR (पूर्व व्यवहारता अहवाल) पूर्ण केल्यास, अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक मंजूरी प्राप्त करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून त्यास मंजूरी प्राप्त झाल्यास व योजनेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर - १५%<br>• पर्यवेक्षण व तांत्रिक सहाय्य, कंत्राटदराकडून काम झाल्यानंतर व कामाचा पुर्णत्वाचा दाखला प्राप्त झाल्यानंतर - ७०%<br>• कामाची समाधानकारक देखाभाल दुरुस्ती झाल्यानंतर - १५% (एकूण ५ वर्षात समान हप्त्यात विभागून)<br>➢ **शासनाकडुन प्राप्त होणाऱ्या सुचना/ शासन परिपत्रक/ शासन निर्णय यामध्ये उपरोक्त बाबत बदल झाल्यास त्यानुसार आपल्या करारामाध्ये बदल करण्यात येईल व ते आपणास बंधनकारक असणार आहे.** |
| १३) | निवड केलेल्या संस्थेने संबंधित ग्रामपंचायतीशी १००/- रु.च्या स्टॅम्पवर सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) कामाबाबत करार करावा. |
| १४) | निवड केलेल्या संस्थांचे करार कोणतेही कारण न देता रद्द करणेचे अधिकार मा.मु.का.अ., जि.प.रत्नागिरी यांचेकडे राखून ठेवण्यात आले आहेत. |
| १५) | मागील १ ते ५ वर्षे सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन मध्ये तांत्रिक सहाय्य संस्था म्हणुन काम केल्याचे शासकीय/ निमशासकीय (शासनाचे) अनुभव प्रमाणपत्र सोबत सादर करणे आवश्यक आहे. |
| १६) | किमान १ वर्षाचा सागरी किनारी भागात सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन मध्ये तांत्रिक सहाय्य संस्था म्हणुन काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र सोबत सादर करणे आवश्यक आहे. |
| १७) | तांत्रिक/ व्यावसायीक/ स्वयंसेवी संस्थेने निविदा भरताना निविदेसोबत तांत्रिक मनुष्यबळाचा तपशिल भरुन सादर करणे आवश्यक (बंधनकारक) आहे. सदर तपशिलामध्ये किमान ५ व्यक्ती असणे |

| | |
|---|---|
| | आवश्यक आहे, त्यापैकी १ स्थापत्य अभियंता व १ पर्यावरण अभियंता आवश्यक (बंधनकारक) आहे. |
| १८) | उपरोक्त प्रपत्र अ व ब याची माहिती भरुन तसेच अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे प्रमाणपत्र जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद रत्नागिरी यांचेमार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रपत्रामध्ये प्रस्ताव जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्याकडे सादर करण्यात यावेत. विहीत मुदतीनंतर सादर केलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. |
| १९) | निविदेमध्ये प्राप्त तांत्रिक/ व्यावसायीक/ स्वयंसेवी संस्थांमध्ये प्राधान्याने तांत्रिक संस्थेस प्रथम प्राधान्य दिले जाईल. तसेच संस्था निवड प्रक्रीयेमध्ये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. रत्नागिरी यांच्याकडे सर्व अधिकार राखुन ठेवण्यात आले आहेत. |

स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत सन २०२१-२२ व २०२२-२३ साठी रत्नागिरी जिल्हयातील गावांमध्ये सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनकरण्याकरिता शासन निर्णयानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन सादर करावयाचे आहे. शासन निर्णयानुसार गावासठी अनुज्ञेय असणाऱ्या निधीच्या प्रमाणात अंदाजपत्रक तयार करावयाचे आहे. अंदाजपत्रकीय रकमेच्या ५% व अधिकतम १.०० लक्ष यापेक्षा जी कमी असेल ती रक्कम सहाय्यकारी संस्थेस अनुज्ञेय राहणार आहे (शासन निर्देशानुसार). संस्थेस अनुज्ञेय रक्कम संबंधित ग्रामपंचायत द्वारा अदा करण्यात येईल.

सही/-
( श्री.ए.जे.भोसले)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा.वस्व.)
जिल्हा परिषद रत्नागिरी.

सही/-
(डॉ. इंदुराणी जाखड - भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी.

# जाहिरात

| |
|---|
| **महाराष्ट्र शासन**<br>**(जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद रत्नागिरी)**<br>**स्वारस्य अभिव्यक्ति (EOI)**<br>**Expression of Interest Notice**<br>**स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत तांत्रिक/ व्यावसायीक/ स्वयंसेवीसंस्था म्हणून काम करु इच्छिणाऱ्या संस्थांची विहीत नमुन्यात सुची तयार करण्यासाठी आवेदन** |
| स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत सन २०२१-२२ व २०२२-२३ साठी रत्नागिरी जिल्हयातील गावांमध्ये सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन अंमलबजावणीकरीता सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रकीय प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे, तांत्रिक सल्ला /सहाय्य प्रदान करणे तसेच सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेसाठी पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील काम करणाऱ्या तांत्रिक सहयोगी संस्था / व्यक्ती (TSP) यांच्याकडून सहयोग देण्याची इच्छा असेल त्यांच्याकडून अर्ज ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत. याबाबतचे कामाचे प्रारुप, अटी व शर्ती https://www.zpratnagiri.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर अर्ज जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्याकडे सादर करण्यात यावेत. |
| **अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख दि. ०८/०३/२०२२ रोजी सायंकाळी ३.०० पर्यंत** |
| **अध्यक्ष,**<br>मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी.<br>भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, माळनाका, रत्नागिरी - ४१५६१२<br>दुरध्वनी क्रमांक : ०२३५२-२२०३४१ E-mail id :- sbmzpratnagiri३@gmail.com |

सही/-
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा.वस्व.)
जिल्हा परिषद रत्नागिरी.

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी.

**कामाचे नांव :- स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत सन २०२१-२२ व २०२२-२३ साठी रत्नागिरी जिल्हयातील गावांमध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प कामाकरिता सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/ सहाय्य प्रदान करण्यासाठी संस्थेची निवड करणे.**

१) एका व्यक्तीस एकच निविदा भरता येईल.
२) निविदा एका लिफाफ्यामध्ये सादर करावी. लिफाफ्यामध्ये तांत्रिक माहितीची कागदपत्रे व संस्थेची इतर आवश्यक कागदपत्रे असावी. शासनामार्फत ठरविण्यातआलेल्या दरामध्ये वाटाघाटी करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. रत्नागिरी यांच्याकडे राखुन ठेवण्यात आले आहेत.
३) तांत्रिक लिफाफ्यामधील माहिती योग्य असल्यास निविदे प्रक्रियेमध्ये पुढे जाता येईल.
४) सोबत जोडलेल्या अटी व शर्ती नुसार सर्व आवश्यक कागदपत्र निविदेमध्ये सादर करणे आवश्यक आहे.
५) मंजूर झालेल्या निविदा धारकास एकूण तरतुदीच्या ३% अनामत रक्कम स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण), जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्या नांवे ऑनलाईन पध्दतीने RTGS/NEFT द्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा खारेघाट रोड, रत्नागिरी खाते क्र.३२७७२००७८२८मध्ये सुरक्षा अनामत रक्कम जमा करणेत यावी व रक्कम भरणा केलेल्या चलनाची प्रत या कार्यालयाकडे सादर करण्यात यावी.

## निविदेची वैधता

१) निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापासून एक वर्षा पर्यंत वैध राहील.
२) एकदा सादर केलेल्या निविदेमध्ये कोणताही बदल मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्या मंजूर लेखी आदेशाशिवाय निविदाधारकास करता येणार नाही.

## निविदेचे मुल्यमापन

१) पाणी व स्वच्छता विभाग तसेच ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी यांचेकडून निविदेची तुलना व मुल्यमापन केले जाईल. त्यासाठी योग्य पध्दतीने साक्षांकित केलेले असावे, अटी व शर्ती मंजूर असाव्यात.

**सही/-**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व स्व.)**
**जिल्हा परिषद रत्नागिरी.**

**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद रत्नागिरी.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी व स्वच्छता विभाग**
**जिल्हा परिषद रत्नागिरी.**
**निविदा सुचना क्रमांक-१ (प्रथम निविदा सुचना)  दि. २४.०२.२०२२**

पाणी व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी यांचे **स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत सन २०२१-२२ व २०२२-२३ साठी रत्नागिरी जिल्हयातील गावांमध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प कामाकरिता सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/ सहाय्य प्रदान करण्यासाठी संस्थेची निवड** करण्यासाठी एक लिफाफा पध्दतीने मोहोरबंद निविदा तांत्रिक/ व्यावसायीक/ स्वयंसेवीसंस्था यांचेकडून मागविण्यात येत आहेत.

सदर निविदेबाबत अटी व शर्ती व निविदा फॉर्म https://www.zpratnagiri.org या अधिकृत वेबसाईट वरुन दिनांक २५/०२/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजल्यापासून दिनांक ०७/०३/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत डाऊन लोड करुन घेता येतील. सदर निविदा दिनांक ०८/०३/२०२२ रोजी सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्याकडे सादर करण्यात यावेत. सदर भरलेल्या निविदा दिनांक ०९/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मक्तेदार अगर त्याच्या प्रतिनिधी समक्ष उघडता येतील. त्या दिवशी निविदा उघडणे शक्य न झाल्यास, अन्य सोयीच्या दिवशी निविदा उघडण्यात येतील. कोणतेही कारण न देता निविदा रद्द करणेचे अथवा अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे अथवा पात्र निविदा धारकांशी वाटाघाटी करण्याचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रत्नागिरी यांनी राखून ठेवण्यात आले आहेत.

सही /-
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व स्व.)**
**जिल्हा परिषद रत्नागिरी.**